# महाराष्ट्र विधानपरिषद

## तिसरे (हिवाळी) अधिवेशन, २०२३

---

### अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

### प्रश्नांची एकूण संख्या - २०

---

### नांदेड शहरात व्हॉटस् ॲपचा वापर करुन जुगार खेळला जात असल्याबाबत

**(१) २७१० (२२-११-२०२२) श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, डॉ.वजाहत मिर्झा :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नांदेड शहरात प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे व्हॉट्सॲपचा वापर करुन मटका हा जुगार खेळला जात असल्याचे दिनांक ३ फेब्रुवारी, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने मटका माफियांवर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (०३-११-२०२३) :** (१) नांदेड शहरात प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे हॉटस्ॲपचा वापर करुन मटका हा जुगार खेळला जात असल्याचे दिनांक ०३ फेब्रुवारी, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले नाही.
(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

### राज्यातील ग्रामपंचायत कर वसुली बंद केल्याबाबत

**(२) ४२४१ (१७-०७-२०२०) श्री.निलय नाईक, श्री.प्रविण दरेकर :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोरोना लॉकडाऊनमुळे राज्यातील ग्रामपंचायत कर वसुली माहे मार्च, २०२० मध्ये बंद करण्यात आली असून माहे मार्च-एप्रिल या दोन महिन्यात सुमारे ५० ते ७० टक्के कर वसुली होते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, कर वसुली बंद केल्यामुळे ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांचे वेतन व दैनंदिन होणारे खर्च जसे गाव व गाड्या सॅनिटाईझ करणे, नालेसफाई करणे, ब्लिचिंग पावडर खरेदी करणे इत्यादी कामे करता येत नसल्यामुळे ग्रामसेवक व सरपंच यांना काम करणे अवघड होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदरहू समस्यांचे निराकरण करण्यासाठी कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीश महाजन (१७-१०-२०२३) :** (१) अंशत: खरे आहे.

(२) हे खरे नाही

(३) ग्रामपंचायत कर्मचारी यांचे वेतन महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग, शासन निर्णय क्र.व्हिपीएम २०१७/ प्र.क्र.२७/पंरा-३, दिनांक ०६ जानेवारी, २०१८ अन्वये आरजी एसए, पुणे यांचेमार्फत होत असल्यामुळे अडचण निर्माण झालेली नाही. तसेच ग्रामपंचायतीचा दैनंदिन खर्च व कोरोना महामारीवरील खर्च जसे की,गाव व गाड्या सॅनिटायझर करणे, नाला सफाई करणे, ब्लिचिंग पावडर खरेदी करणेसाठी शासन परिपत्रक क्रमांक चौविआ-२०२०/प्र.क्र.४२/वित्त-४, मुंबई, दिनांक ३१/०३/२०२० अन्वये वित्त आयोगातून रक्कम खर्च करण्यास शासनाने मंजुरी दिलेली आहे. तसेच महाराष्ट्र शासन ग्रामविकास विभाग शुध्दीपत्रक क्रमांक चौविआ २०२०/प्र.क्र.४२/वित्त-४,दिनांक ०८/०४/२०२० अन्वये ग्रामपंचायत स्तरावर काम करणाऱ्या कर्मचारी यांना प्रोत्साहन भत्ता देणेबाबत कळविण्यात आल्यामुळे अडचण निर्माण झाल्याचे निदर्शनास आलेले नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील मुदत संपलेल्या ग्रामपंचायतींवर शासकीय अधिकारी व जिल्हा परिषद शाळेच्या मुख्याध्यापकाची प्रशासक म्हणून नेमणूक केल्याबाबत

**(३) ५२१६ (२०-११-२०२०) श्री.रामदास आंबटकर :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात माहे एप्रिल ते डिसेंबर, २०२० मध्ये मुदत संपलेल्या ४८९९ ग्रामपंचायतीवर शासकीय अधिकारी व जिल्हा परिषद शाळेच्या मुख्याध्यापकाची प्रशासक म्हणून नेमणूक केल्याचे दिनांक ८ सप्टेंबर, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने तीन ते चार ग्रामपंचायतीवर एकच प्रशासकीय अधिकारी नियुक्त केले असून याबाबत उच्च न्यायालयाने शासनाला स्पष्टीकरण देण्याचे निर्देश दिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने न्यायालयाला स्पष्टीकरण दिले काय व कोणते,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीश महाजन (१३-१०-२०२३) :** (१) होय, हे अंशत: खरे आहे.

मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी याचिका क्रमांक १८८/२०२० मध्ये दिनांक १४/०८/२०२० रोजी दिलेल्या आदेशानुसार राज्यात माहे एप्रिल ते डिसेंबर, २०२० या कालावधीमध्ये कोविड- १९ संसर्गजन्य महामारीमुळे निवडणूका घेता आल्या नसल्याने मुदत संपलेल्या ४८९९ ग्रामपंचायतीवर शासकीय सेवेत कार्यरत असणारे शासकीय अधिकारी/कर्मचारी यांचीच प्रशासक म्हणून नेमणूक करण्यात आली आहे.

(२) नाही, हे खरे नाही.

(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## यवतमाळ जिल्ह्यातील अनेक शाळांमध्ये क्रीडा शिक्षकांची पदे रिक्त असल्याबाबत

**(४) ८७८९ (२०-०७-२०२१) डॉ.वजाहत मिर्झा :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) यवतमाळ जिल्ह्यातील अनेक शाळांमध्ये क्रीडा शिक्षकांची पदे रिक्त असल्याबाबत व काही ठिकाणी सदर विषयासाठी प्रभारी शिक्षक कार्यरत असल्याचे माहे मे, २०२१ च्या पहिल्या सप्ताहात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तदनुसार यवतमाळ जिल्ह्यातील शाळांमध्ये पूर्णवेळ क्रीडा शिक्षक देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिपक केसरकर (०६-११-२०२३) :** (१) हे खरे आहे.

(२) आयबीपीएस कंपनीमार्फत शिक्षक अभियोग्यता व बुध्दीमत्ता चाचणी, २०२२ चा निकाल प्रसिध्द झालेला असून, त्यामधील प्राप्त गुणांकनानुसार राज्यात पवित्र प्रणालीमार्फत शिक्षक भरतीची कार्यवाही करण्यात येत आहे. तसेच विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये यास्तव सेवानिवृत्त शिक्षकांची तात्पुरत्या स्वरूपात मानधन तत्वावर नेमणूक करण्याबाबत निर्णय घेण्यात आलेला आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील शाळांमध्ये विज्ञान, गणित व इंग्रजीचे शिक्षण देण्यासाठी शिक्षकांची भरती करण्याबाबत

**(५) १००१२ (२०-०७-२०२१) श्री.किरण सरनाईक : दिनांक ६ जुलै, २०२१ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तरांच्या यादी क्रमांक २ मधील प्रश्न क्रमांक ७११० ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात पवित्र पोर्टलच्या माध्यमातून पद भरती होत नसल्याने अनेक शाळांत विज्ञान, गणित व इंग्रजी यांसारख्या महत्त्वाच्या विषयांचे शिक्षण देणाऱ्या शिक्षकांची पदे रिक्त असल्याचे माहे मे, २०२१ च्या शेवटच्या सप्ताहात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तद्नुसार राज्यातील शाळांमध्ये विज्ञान, गणित व इंग्रजी यासारखे महत्त्वाचे शिक्षण देण्यासाठी शिक्षकांची भरती करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिपक केसरकर (०६-११-२०२३) :** (१) हे खरे आहे.

(२) आधार प्रमाणित संचमान्यतेनुसार शासन निर्णय दिनांक २१/०६/२०२३ नुसार रिक्त पदाच्या ८० टक्के पदे बिंदु नामावलीप्रमाणे पवित्र प्रणालीद्वारे भरण्याकरीता परवानगी देण्यात आलेली आहे. सद्य:स्थितीत मा.उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद येथे भरती प्रकरणी जनहित याचिका दाखल करण्यात आली आहे.

मा.न्यायालयाने पवित्र पोर्टलद्वारे करण्यात येणाऱ्या भरतीवरील स्थगिती दिलेली होती.

सदर स्थगिती मा.न्यायालयाने उठविली असून, त्यानुसार पुढील कार्यवाही सुरू आहे. तथापि, भरती प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये याकरीता सेवानिवृत्त शिक्षकांचे कंत्राटी तत्वावर तात्पुरत्या स्वरूपात नियुक्ती करण्याची कार्यवाही सुरू आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील रात्र शाळांमधील कर्मचाऱ्यांना पूर्णवेळ वेतनश्रेणी लागू करण्याबाबत

**(६) १०१७७ (२०-०७-२०२१) श्री.विलास पोतनीस : तारांकित प्रश्न क्रमांक ८९०७ ला दिनांक ३० जुलै, २०२१ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील रात्र शाळांमधील कर्मचाऱ्यांना पूर्णवेळ वेतनश्रेणी लागू करण्याबाबत दिनांक १७ मे, २०१७ रोजी शासनाने निर्णय घेतला असतानाही पुणे जिल्हा परिषदेच्या माध्यमिक शिक्षण विभागाखेरीज राज्यात अन्यत्र कुठेही उक्त शासन निर्णयाची आजतागायत अंमलबजावणी करण्यात आली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू शासन निर्णयाची अंमलबजावणी योग्यरितीने होत नसल्याच्या तक्रारी दूर करून रात्रशाळांच्या समस्यांबाबत उपाययोजना सुचविण्यासाठी शासनाने दिनांक २५ जुलै, २०१९ रोजीच्या शासन निर्णयान्वये अभ्यास गटाची स्थापना केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू अभ्यासगटाकडून याबाबतच्या शिफारसी शासनास प्राप्त झाल्या आहेत काय, शिफारसींचे थोडक्यात स्वरूप काय आहे तसेच, शिफारसींबाबत शासनाची भूमिका काय आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिपक केसरकर (०६-११-२०२३) :** (१), (२) व (३) हे खरे आहे.

शासनाने शासन निर्णय दिनांक ०८/११/२०२२ अन्वये रात्रशाळांबाबत सर्वकष धोरण ठरविण्याकरीता आयुक्त (शिक्षण) यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन केली असून, सदर समितीकडून अहवाल प्राप्त झाल्यानंतर त्यानुसार पुढील कार्यवाही करण्यात येईल.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## गहुली (ता.पुसद, जि.यवतमाळ) येथे राज्याचे माजी मुख्यमंत्री स्व. वसंतराव नाईक यांचे स्मारक उभारण्याबाबत

**(७) १४६६१ (२५-०८-२०२२) श्री.किरण सरनाईक :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गहुली (ता.पुसद, जि.यवतमाळ) येथे राज्याचे माजी मुख्यमंत्री स्व. वसंतराव नाईक यांचे स्मारक उभारण्याबाबत येथील नागरिकांकडून मागणी होत असल्याची बाब माहे मे, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने राज्याचे माजी मुख्यमंत्री स्व.वसंतराव नाईक यांचे जन्मगावी स्मारक उभारण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीश महाजन (२७-१०-२०२३) :** (१) हे खरे नाही. तथापि, स्व.वसंतराव नाईक यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त खुल्या सभागृहाचे बांधकाम व सौंदर्यीकरण करण्यात आले आहे.
(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## आनंदव्हाळ व चौके नांदरूख (ता.मालवण, जि.सिंधुदुर्ग) या पंतप्रधान ग्रामसडक योजनेंतर्गत तयार करण्यात आलेल्या रस्त्याची दुरवस्था झाल्याबाबत

**(८) १५०७३ (१९-१०-२०२२) श्री.विलास पोतनीस, श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) आनंदव्हाळ व चौके नांदरूख (ता.मालवण, जि.सिंधुदुर्ग) या पंतप्रधान ग्रामसडक योजनेंतर्गत करण्यात आलेल्या रस्त्यावर पडलेल्या खड्ड्यांमुळे रस्त्याची दुरवस्था झाली असल्याची बाब दिनांक २८ सप्टेंबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर रस्त्याच्या डागडुजीकडे संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांकडून दुर्लक्ष करण्यात आले असल्याने वाहनांचे अपघात होवून जीवित व वित्त हानी होण्याची शक्यता निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त रस्त्याच्या दुरवस्थेची शासनाने पाहणी केली आहे काय, पाहणीत काय आढळून आले व त्यानुषंगाने सदर रस्त्यांचे नूतनीकरण करुन रस्त्याच्या डागडुजीकडे दुर्लक्ष करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री.गिरीश महाजन (२२-०९-२०२३) :** (१) होय.
(२) अंशत: खरे आहे.
(३) होय, मालवण उप विभागाकडून दिनांक ८/१२/२०२० रोजी संयुक्त पाहणी करणेत आली. सदर रस्त्याच्या कामास १० वर्षांचा DLP असल्याने देखभाल व दुरुस्ती कालावधी संपल्यानंतर रस्ता सुस्थितीत जिल्हा परिषदेकडे हस्तांतरीत करणे आवश्यक आहे. सद्य:स्थितीत मुख्यमंत्री ग्राम सडक योजना-भाग-२ या कार्यक्रमांतर्गत सदर रस्त्याची एकूण लांबीपैकी खराब झालेल्या ३ कि.मी. लांबीचे रस्त्याच्या कामास प्रशासकीय तसेच तांत्रिक मान्यता मिळाली आहे. सदर काम निविदा स्तरावर आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील जिल्हा परिषदेतील शिक्षक व शिक्षकेतर निवृत्तीवेतन दरमहा विहीत मुदतीत अदा करणेबाबत

**(९) १८६३५ (२५-०३-२०२३) श्री.सत्यजीत तांबे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील जिल्हापरिषदांतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे मासिक सेवानिवृत्ती व कुटुंब निवृत्त वेतन दरमहा विहीत मुदतीत होत नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यामुळे जिल्हा परिषदांतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना आर्थिक अडचणींचा सामना करावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले तद्नुषंगाने जिल्हा परिषदांतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे निवृत्ती वेतन व कुटुंब निवृत्ती वेतन दरमहा विहीत मुदतीत अदा करणेबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिपक केसरकर (०३-११-२०२३) :** (१) अंशत: खरे आहे.

(२) अंशत: खरे आहे.

(३) सेवानिवृत्त शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना निवृत्तीवेतन वेळेत प्राप्त होण्याच्या दृष्टीकोनातून क्षेत्रिय कार्यालयास सूचना देणेबाबत व या अनुषंगाने वेळोवेळी आढावा घेण्याबाबत आयुक्त (शिक्षण) यांना सुचना देण्यात आल्या आहेत. तसेच, शिक्षण संचालक (प्राथमिक) स्तरावर तपासणी केली असून कार्यवाही करण्याची प्रक्रिया सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## महाराष्ट्रातील वीज प्रकल्पातील फ्लाय ॲशमुळे होणाऱ्या प्रदुषणाला आळा घालण्यासाठी धोरण निश्चित करण्याबाबत

**(१०) १८७८४ (१०-०५-२०२३) श्री.अंबादास दानवे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्याला एकूण आवश्यक असलेल्या वीजेपैकी ७१ टक्के वीज ही १९ औष्णिक केंद्रातून कोळशाच्या वापरातून निर्माण केली जात असून त्यातून वापरण्यात येणाऱ्या कोळशाच्या वापरापैकी ४० टक्के राख निर्माण होत असून पर्यावरणाची हानी टाळण्यासाठी फ्लाय ॲशच्या वापरासाठी स्वतंत्र धोरण स्वीकारण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यात वॉश केलेला कोळशांमधून वीज निर्मितीमध्ये वाढ होत असल्याचे सांगून कोल वॉशरीच्या कारखान्यांना शासनाने मान्यता दिली आहे काय, तसेच खापरखेडा औष्णिक विद्युत निर्मिती केंद्रामध्ये सन २०१९-२० या वर्षात साधा कोळसा वापरुन करण्यात आलेल्या वीज निर्मिती पेक्षा कमी वीज सन २०२०-२०२१ च्या वॉश केलेल्या कोळशाच्या माध्यमातून झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कन्हान नदीमध्ये खापरखेडा औष्णिक वीज निर्मिती केंद्रामधून पाणी मिश्रित फ्लाय ॲश सोडण्यात आल्याने त्यांच्या फ्लाय ॲशमुळे जलशुध्दीकरण केंद्रातील पंप बंद करण्याच्या घटना घडल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, औष्णिक केंद्राच्या फ्लाय ॲशमुळे होणाऱ्या प्रदुषणामुळे शेतीवर तसेच शेतीच्या उत्पन्नावर देखील परिणाम झाला असून प्रकल्पामध्ये जमीन संपादित केलेल्या तसेच फ्लाय ॲशच्या प्रदुषणामुळे बाधित झालेल्या शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्यासाठी कोणती तरतुद करण्यात आली, अद्यापपर्यंत किती शेतकऱ्यांना मदत देण्यात आली आहे,
(५) असल्यास, सदर प्रकरणी औष्णिक केंद्राच्या फ्लाय ॲशमुळे होणाऱ्या प्रदुषणाला आळा घालण्यासाठी तसेच राख तलावांच्या जागेचा उपयोग करून त्या जागेवर सौर ऊर्जा प्रकल्प राबविण्याबाबत तसेच औष्णिक केंद्राच्या वीज प्रकल्पातुन नदीपात्रात सोडण्यात येणाऱ्या फ्लाय ॲशमुळे होणाऱ्या प्रदुषणाची चौकशी करुन चौकशीच्या अनुषंगाने केंद्र शासनाच्या धोरणानुसार दंडात्मक कारवाई करुन होणाऱ्या प्रदुषणाला आळा घालण्यासाठी व शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्याबाबत कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहेत,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (१४-०७-२०२३) :** (१) शासन निर्णय दिनांक १३/१२/२०१६ अन्वये सन २०१६ ते सन २०२० या ५ वर्षासाठी राज्य फ्लाय ॲश धोरण-२०१६ प्रकाशित केले आले. महाराष्ट्र राज्यातील सर्व औष्णिक विद्यूत केंद्रातील फ्लाय ॲशचा वापर करण्यासाठी हे धोरण आहे. तसेच पर्यावरण, वन व जलवायु परिवर्तन मंत्रालय, भारत सरकार (MoEFCC) च्या दिनांक ३१/१२/२०२१ व विद्युत मंत्रालय यांच्या दिनांक २२/०२/२०२२ अन्वये राख वापराबाबत सुधारित मार्गदर्शन तत्वे निर्गमित करण्यात आली आहेत. त्यानुषंगाने १००% राखेचा वापर होऊन पर्यावरणाची हानी टळेल.
(२) कोल वॉशरीच्या कारखान्याना शासनाने मान्यता दिली नसून कोळसा वॉश (धुण्यास) करण्यास मान्यता दिली आहे.

महानिर्मितीने डब्लु सी एल (WCL), एस ई सी एल (SECL) आणि एम् सी एल् (MCL)यांच्या खाणीतील कोळसा उचलून वॉशरीमध्ये वॉश केलेला कोळसा महानिर्मितीच्या विविध औष्णिक वीज केंद्राना पुरविण्यासाठी महाराष्ट्र सरकारच्या मालकीची महाराष्ट्र राज्य खनिकर्म महामंडळाची (MSMC) नोडल एजन्सी म्हणून नेमणूक केलेली आहे.

महानिर्मितीला धुतलेला कोळसा पुरवण्यासाठी लागणाऱ्या कोल वॉशरीजची, खुल्या निविदेची सर्व प्रक्रिया, निविदाकारांची छाननी आणि यशस्वी बोलीच्या आधारावर महाराष्ट्र राज्य खनिकर्म महामंडळाद्वारे अंतिम निवड केली आहे.

सन २०१९-२० मध्ये खापरखेडा औष्णिक विद्युत केंद्रात ७२६०.५३ दशलक्ष यूनिट विजनिर्मिती झाली. तसेच सन २०२०-२१ मध्ये ७९३०.८४ दशलक्ष यूनिट विजनिर्मिती झाली. ह्यावरून सन २०१९-२० च्या तुलनेत सन २०२०-२१ या काळात खापरखेडा औष्णिक विद्युत केंद्रात विद्युत निर्मिती जास्त झालेली आहे.
(३) खापरखेडा औष्णिक विद्युत केंद्राचे वारेगाव व नांदगाव असे दोन ॲश बंड आहेत. त्यापैकी नांदगाव राख बंधारा हा ५०० मे.वॅटसाठी वापरण्यात येत होता.नांदगाव राख बंधारा हा दिनांक ०७/११/२०२१ ला

सुरू करण्यात आला होता आणि दिनांक ०३/०२/२०२२ ला काही कारणास्तव बंद करण्यात आला. त्यामुळे ५०० मे.वॅट विज संचामधून निघणारी राख ही वारेगाव राख बंधाऱ्यात जात आहे.

खापरखेडा औष्णिक विद्युत केंद्र येथिल ४x२१० मे.वॅ. व १x५०० मे.वॅ. या सर्व संचाची अॅश ही वारेगाव अॅश बंड मध्येच टाकण्यात येते. वारेगाव अॅश बंडची क्षमता मर्यादित आहे. जुलै-ऑगस्ट २०२२ या काळात अतिवृष्टी झाल्यामुळे काही प्रमाणात राख सदृष्य पाणी हे बंधाऱ्याच्या टो-ड्रेनमधुन वाहीले व रिकव्हरी पंपच्या संपमधुन बाजुच्या वाहणाऱ्या नाल्यातुन कन्हान नदीच्या पात्रात वाहत गेले. नाला ज्या ठिकाणी कन्हान नदीला मिळतो त्याच ठिकाणी पाणीपुरवठा होत असलेल्या इनटेक वेल आहेत. तेथे राख सदृष्य पाणी आल्याने पंप सुरेक्षेच्या कारणाने बंद करावे लागले परंतु काही तासाच्या आतच सदर पंप सुरू करण्यात आले होते.

अॅश बंड मधुन निघणाऱ्या पाण्याचा योग्य वापर होण्याच्या दृष्टीने वारेगाव येथे रिकव्हरी पंप लावलेले असून त्याद्वारे ते पाणी प्लांट मध्ये वापरण्यात येते. हे पंप हाऊस पूर्ण क्षमतेने सुरू आहे

(४) औष्णिक केंद्राच्या फ्लाय अॅशमुळे होणाऱ्या प्रदुषणामुळे शेतीवर तसेच शेतीच्या उत्पन्नावर परिणाम झाला अशी कोणतीही नोंद नाही. परंतु, सन २०२२-२३ च्या अतिवृष्टीमुळे नाल्याच्या पाण्यामध्ये राख वाहुन गेल्यामुळे राख मिश्रित पाणी हे लगत असलेल्या शेतात गेले. कार्यालयाने मौका पंचनामा मा.उपसरपंच व एम.एस.पी.जी.सि.एल. कर्मचारी, अधिकारी व कृषी सहायक अधिकारी उपस्थित होते व सदरहु पंचनामा तहसिलदार यांचेकडे सुपुर्द केला आहे. परंतु, सद्य:स्थितीत नुकसान भरपाईबाबत पत्रक प्राप्त झाले नाही. प्रकल्पामध्ये जमीन संपादीत केलेल्या शेतकऱ्यांना त्याचा मोबदला दिला आहे. फ्लाय अॅशच्या प्रदुषणामुळे बाधित झालेल्या शेतकऱ्यांबाबत कोणतीही नोंद नसल्यामुळे त्यांना मदत देण्यात आली नाही.

(५) वारेगाव अॅश बंड येथे खापरखेडा औष्णिक विद्युत केंद्र येथील ४ x २१० मे.वॅ. व १ x ५०० मे.वॅ. ची अॅश साठविण्यात येत आहे व तसेच हा अॅश बंड कार्यान्वित असल्यामुळे त्याजागेवर सौर ऊर्जा प्रकल्प राबविण्याचा कोणताही प्रस्ताव खापरखेडा औष्णिक विद्युत केंद्राच्या विचाराधीन नाही. औष्णिक केंद्राच्या वीज प्रकल्पातुन नदीपात्रात फ्लाय अॅश सोडण्यात येत नाही.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मळणगाव (ता.कवठेमहांकाळ, जि.सांगली) येथील जिल्हा परिषदेच्या शाळेतील शिक्षक नियमित वेळेत शाळेत उपस्थित राहत नसल्याबाबत

**(११) १८८६३ (०८-०८-२०२३) श्री.अरुण लाड :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मळणगाव (ता.कवठेमहांकाळ, जि.सांगली) येथील जिल्हा परिषदेच्या शाळेतील इयत्ता पहिली ते सातवी पर्यंतच्या वर्गात विद्यार्थ्यांची संख्या १४३ आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर शाळा भरण्याची दैनंदिन वेळ सकाळी ७.०० वाजतांची असताना, शाळेतील एकही शिक्षक वेळेत न येता, दररोज ८ ते ८.३० या वेळेत शाळेत येत असल्याचे निदर्शनास आले आहे, हेही खरे आहे काय,

(३) असल्यास, विद्यार्थी व शिक्षकांनी सांगितलेल्या वेळेनुसार सकाळी ७.०० वाजता जिल्हा परिषद शाळेसमोर येऊन उभी राहत असून शिक्षक मात्र उशिराने येत असल्याने ग्रामस्थ-पालकांनी त्याबाबत ग्रामपंचायत तालुका व जिल्हा प्रशासनाकडे तक्रारी करुनही शिक्षकांकडून त्याची दखल घेतली जात नसल्याचे दिनांक १३ एप्रिल,२०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हेही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी जबाबदार असणाऱ्या शिक्षकांवर कारवाई करण्याची मागणी ग्रामस्थ-पालकांनी शासनाकडे माहे एप्रिल, २०२३ रोजी वा त्यादरम्यान केली असल्याचेही निदर्शनास आले आहे, हेही खरे आहे काय,
(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन मळणगाव (ता.कवठेमहांकाळ, जि.सांगली) येथील जिल्हा परिषदेच्या शाळेतील शिक्षकांनी नियमित वेळेत शाळेत उपस्थित रहावे यादृष्टीने निदेश देऊन कोणती कारवाई केली अथवा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीश महाजन (१०-११-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) प्रकरणी पर्यवेक्षीय यंत्रणेमार्फत खातरजमा करण्यात आली असता, अशी बाब निदर्शनास आली नाही.
(३), (४), (५) व (६) प्रस्तुत प्रकरणी मळणगांव येथील ग्रामस्थानी दिनांक २०/०४/२०२३ रोजी मळणगांव (ता.कवठेमहांकाळ) जिल्हा परिषद प्राथमिक शाळेचे शालेय अध्यापन व व्यवस्थापनाबाबत तसेच गुणवत्ता सुधारणेविषयी मुख्याध्यापकांना सूचना देऊनही कोणताही सकारात्मक बदल न झाल्याबाबतची तक्रार जिल्हा परिषद, सांगली कार्यालयास दाखल केली आहे.

सदर दाखल तक्रार अर्जाच्या अनुषंगाने जिल्हा परिषद, सांगली यांनी दिनांक २५/०४/२०२३ अन्वये गट शिक्षणाधिकारी, कवठेमहांकाळ यांना सदर तक्रारीची दखल घेवून तात्काळ सक्षम शाळा भेट करुन पालकसभा घेणे तसेच शालेय कामकाजाबाबत पालकांना शिक्षकांसह विश्वास देण्याची कार्यवाही करण्याच्या सूचना देण्यात आल्या.

त्यानुसार गट शिक्षणाधिकारी यांनी सदर शाळेतील शालेय कामकाजात सुधारणा करण्यात आली असल्याचा अहवाल सादर केला आहे. याशिवाय सदर प्रकरणात जिल्हा परिषद स्तरावरुन दिनांक २५/०४/२०२३ च्या आदेशान्वये दोन विस्तार अधिकारी (शिक्षण) यांची चौकशी अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आलेली आहे.

---

## शालेय शिक्षण प्रणालीमध्ये कार्यरत असलेल्या पदवीधर शिक्षकांना समान वेतन लागू करण्याबाबत

**(१२) १९२५३ (०४-०८-२०२३) श्री.धीरज लिंगाडे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अभिजित वंजारी, श्री.राजेश राठोड, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.सुधाकर अडबाले :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील शालेय शिक्षण विभागातील २५ टक्के शिक्षकांनाच त्यांच्या वेतनानुसार इतर शिक्षकांपेक्षा जास्त वेतन, व सर्व शिक्षकांना समान काम, शैक्षणिक पात्रता समान असणे वेतनसुध्दा समान असणे आवश्यक आहे परंतु पदवीधर शिक्षकांच्या वेतनामध्ये तफावत दिसून येत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले चौकशीच्या अनुषंगाने सर्व शिक्षकांना समान वेतन लागू करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिपक केसरकर (०३-११-२०२३) :** (१) हे खरे आहे.
(२) राज्यातील उच्च प्राथमिक (इ. ६वी ते ८ वी) वर्गांवर नियुक्त शिक्षकांना पदवीधर वेतनश्रेणी लागू करण्याच्या अनुषंगाने अभ्यास करुन शिफारशींसह अहवाल सादर करण्याकरीता शासन निर्णय दिनांक २७/०६/२०२२ अन्वये आयुक्त, शिक्षण यांच्या अध्यक्षतेखाली अभ्यास समितीची नेमणूक करण्यात आली आहे. सदर समितीचा अहवाल प्राप्त झाला असून मंत्रिमंडळ टिप्पणी वित्त विभागाच्या अभिप्रायार्थ सादर करण्यात येत आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## उच्चतंत्र शिक्षण विभागाने इरादा पत्र दिल्याने शंभरहुन कायम विनाअनुदान तत्त्वावर नवीन महाविद्यालय सुरू होणार असल्याबाबत

**(१३) १९६०१ (०४-०८-२०२३) श्रीमती उमा खापरे, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.प्रसाद लाड, श्री.रमेशदादा पाटील, श्री.रामदास आंबटकर, श्री.निलय नाईक, अॅड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात नवीन शैक्षणिक वर्षात शेकडो संस्थांना उच्चतंत्र शिक्षण विभागाने इरादापत्र दिल्याने किमान शंभराहुन अधिक कायम विना अनुदान तत्त्वावर नवीन महाविद्यालय सुरू होणार असल्याची बाब माहे एप्रिल, २०२३ च्या पहिल्या आठवड्यात वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, इरादापत्र देताना शासनाने कोणताही बृहत आराखडा तयार केलेला नसल्याने ठिक-ठिकाणी कॉलेज सुरु होऊन पुन्हा विद्यार्थी मिळवण्यासाठी स्पर्धा होईल, संस्थेला विद्यार्थी न मिळाल्यास शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना शासनातर्फे देण्यात येणारे वेतन आणि इतर सेवा सुविधा व विद्यार्थ्यांना देय असणाऱ्या सर्व सवलती या महाविद्यालयातून देण्यात येणार आहेत काय,
(३) असल्यास, या अनुषंगाने शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे काय ?
(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत (दादा) पाटील (३१-१०-२०२३) :** (१) शासन आदेश, दिनांक ०१/०४/२०२३ अन्वये सन २०२३-२४ या वर्षाकरीता १२१ नवीन महाविद्यालयांना इरादापत्र मंजूर करण्यात आले आहे.
(२) व (३) महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ च्या कलम ७६ मधील तरतुदीस अनुसरुन सन २०२३-२४ या शैक्षणिक वर्षासाठी अकृषी विद्यापीठांतर्गत नवीन महाविद्यालये/परिसंस्था सुरु करण्यासाठी स्थळ बिंदू निश्चितीबाबत बृहत आराखडा तयार केलेला आहे. सदर बृहत आराखड्यानुसार विद्यापीठांकडून शिफारशीसह प्राप्त झालेल्या प्रस्तावांपैकी पात्र ठरलेल्या महाविद्यालयांना शासनाच्या प्रचलित धोरणानुसार "कायम विना अनुदान" तत्वावर इरादापत्र देण्यात आले आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील औद्योगिक प्रशिक्षण संस्थामध्ये बदली प्रक्रिया राबविताना कोणत्याही संवर्गातील पदे अडवून न ठेवण्याबाबत

**(१४) १९६३९ (०८-०८-२०२३) श्री.किरण सरनाईक :** सन्माननीय **कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये बदली प्रक्रिया राबविताना काही संवर्गातील नियमित पदे गोठविण्यात आली असल्याची बाब माहे मे, २०२३ च्या शेवटच्या सप्ताहात निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने राज्यातील औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये बदली प्रक्रिया राबविताना काही संवर्गातील पदे गोठवू नये दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.मंगलप्रभात लोढा (३०-१०-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय व अधिनस्त कार्यालयांतील गट-क व गट-ड संवर्गातील कर्मचाऱ्यांच्या नियतकालीक/विशेष विनंती/ विभागीय बदल्या ह्या ऑनलाईन (Computerised) पध्दतीने राबविण्याच्या कार्यपध्दतीस कौशल्य विकास व उद्योजकता विभाग, शासन निर्णय, दिनांक २०/०९/२०१९ अन्वये मान्यता देण्यात आली आहे.

सदर शासन निर्णयातील टप्पा-१ मधील अ.क्र/०१/२ नुसार अधिकारी / कर्मचाऱ्यांची मागणी ही सर्वसाधारण शहरी भागात असल्याने शहरी भागातील संस्थांमधील रिक्त पदांची संख्या कमी तर अवघड, आदिवासी क्षेत्रातील रिक्त पदांची संख्या जास्त प्रमाणात आढळून येते. त्यामुळे ग्रामीण, अवघड, आदिवासी क्षेत्रातील प्रशिक्षणार्थ्यांना प्रशिक्षणापासून वंचित रहावे लागते. अवघड क्षेत्रातील रिक्त पदे प्राथम्याने भरावीत असे सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय दिनांक ०९/०४/२०१८ मध्ये नमूद केले आहे. त्यानुसार आदिवासी, अवघड क्षेत्रातील, नक्षलग्रस्त भागातील रिक्त जागा भरुन प्रथमत: निरंक करण्याकरीता रिक्त जागांचे समाणीकरण धोरण अवलंबिण्याबाबत देण्यात आलेले निर्देश विचारात घेऊन रिक्त जागा गोठविण्याची कार्यवाही संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण यांच्यामार्फत करण्यात आली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## शालेय शिक्षण विभागांतर्गतील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे वेतन एका लेखाशिर्षांतर्गत करणेबाबत

**(१५) १९८८८ (०४-०८-२०२३) श्री.किरण सरनाईक :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे वेतन एका लेखाशिर्षामधून होत नसल्याची बाब माहे मे, २०२३ च्या शेवटच्या सप्ताहामध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, चौकशीच्या अनुषंगाने शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे वेतन एका लेखाशिर्षाअंतर्गत करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिपक केसरकर (०३-११-२०२३) :** (१) हे खरे नाही.
(२) प्रश्न उद्‌भवत नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## नागपूर विद्यापीठाच्या सहाव्या सत्राच्या मराठी भाषेच्या विद्यार्थ्यांना जुन्या अभ्यासक्रमाची प्रश्नपत्रिका देण्यात आल्याबाबत

**(१६) २०३५४ (०४-०८-२०२३) श्री.रामदास आंबटकर, श्री.प्रवीण दटके, श्री.प्रविण पोटे-पाटील, श्री.रमेशदादा पाटील, श्री.चंद्रशेखर बावनकुळे :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नागपूर विद्यापीठाच्या उन्हाळी परिक्षा-२०२२ करीता बी.एस.डब्ल्यू. सहाव्या सत्राच्या मराठी भाषेच्या विद्यार्थ्यांना जुन्या अभ्यासक्रमाची प्रश्नपत्रिका देण्यात आल्याचे दिनांक २५ मे, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, चौकशीच्या अनुषंगाने बी.एस.डब्ल्यू. सहाव्या सत्राच्या मराठी भाषेच्या विद्यार्थ्यांना जुन्या अभ्यासक्रमाची प्रश्नपत्रिका देण्यांत येणाऱ्या संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत (दादा) पाटील (०२-११-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या उन्हाळी परिक्षा-२०२२ करीता बी.एस.डब्ल्यू. सहाव्या सत्राच्या परीक्षेदरम्यान विद्यार्थ्यांना जुन्या व नवीन दोन्ही प्रश्नपत्रिका पाठविण्यात आल्या होत्या. परंतु, तांत्रिक अडचणीमुळे एकच प्रश्नपत्रिका डाऊनलोड झाली होती. त्यानंतर तातडीने तांत्रिक दोष दूर करून दुसरी प्रश्नपत्रिका विद्यार्थ्यांना उपलब्ध करून देण्यात आली. त्यामुळे वेळेत परीक्षा पूर्ण केली असल्याने कोणत्याही विद्यार्थ्याचे नुकसान झालेले नाही. तसेच, यासंदर्भात कोणत्याही तक्रारी प्राप्त झालेल्या नाहीत.
(२) व (३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## वर्धा जिल्ह्यातील सेवानिवृत्त शिक्षकांना निवड श्रेणीचा लाभ देण्याबाबत

**(१७) २०४७२ (०४-०८-२०२३) श्री.रामदास आंबटकर :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वर्धा जिल्हा परिषद अंतर्गत सन १९६८ ते १९९० पर्यंत निवड श्रेणी पात्र २४३ सेवानिवृत्त शिक्षकांची निवडश्रेणी प्रकरणे निकाली निघाली नसल्याचे माहे जून, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, तदनुषंगाने सदर २४३ सेवानिवृत्त शिक्षकांना निवडश्रेणीचा लाभ देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिपक केसरकर (०३-११-२०२३) :** (१) होय हे खरे आहे.
(२) निवडश्रेणी मंजूरीबाबत कार्यवाही अंतिम टप्प्यात आहे.
(३) २०% च्या प्रमाणात न देता जादा शिक्षकांना देण्यात आल्याने दरम्यानच्या काळात कार्यवाही झाली नाही.

---

## एलफिस्टन तांत्रिक विद्यालय आणि कनिष्ठ महाविद्यालय बंद पडण्याच्या मार्गावर असल्याबाबत

**(१८) २०६१४ (२८-०७-२०२३) श्री.रमेशदादा पाटील, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.रामदास आंबटकर, श्रीमती उमा खापरे, श्री.चंद्रशेखर बावनकुळे, प्रा.राम शिंदे, श्री.रमेश कराड, श्री.प्रवीण दटके :** सन्माननीय **कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यासह राजकीय आणि सामाजिक क्षेत्रात नामांकित असलेले विद्यार्थी ज्या शाळेला लाभले ते एलफिस्टन तांत्रिक विद्यालय आणि कनिष्ठ महाविद्यालय केवळ शासकीय उदासीनतेमुळे बंद पडण्याच्या मार्गावर असल्याची बाब माहे एप्रिल, २०२३ च्या पहिल्या आठवड्यात वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या शाळेच्या इमारतीमधील शासकीय कार्यालये इतर ठिकाणी स्थलांतरीत करून आगामी शैक्षणिक वर्षापासून शाळेची पटसंख्या वाढविण्याची मागणी या शाळेतील आजी-माजी विद्यार्थ्यांनी शासनाकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, चौकशीच्या अनुषंगाने सदर शाळेची पटसंख्या वाढविण्याच्या केलेल्या मागणीच्या अनुषंगाने कोणती उपाययोजना/ कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.मंगलप्रभात लोढा (०२-११-२०२३) :** (१) नाही, हे खरे नाही.
(२) व (३) होय, हे खरे आहे.

एल्फिन्स्टन तांत्रिक विद्यालयाच्या जागेमध्ये इतर विभागांची ८ कार्यालये कार्यरत आहेत. कुलाबा मतदार संघ निवडणूक कार्यालय, शासकीय अध्यापक महाविद्यालय, राज्य मराठी भाषा विकास संस्था यांचे कार्यालय स्थलांतर करणेबद्दल संबंधित विभागाला जागा रिक्त करण्याबाबत विनंती केली असून पाठपुरावा करण्यात येत आहे.

औद्योगिक प्रशिक्षण संस्था, मांडवी, संस्थेसाठीच्या नवीन इमारतीचे काम पूर्णत्वाकडे असून तद्नंतर सदर संस्था नवीन जागेत स्थलांतरीत होईल. कौशल्य विकास विद्यापीठाला औद्योगिक प्रशिक्षण संस्था,

पनवेल येथे नवीन इमारतीसाठी जागा शासनाकडून देण्यात आली आहे. पूर्व व व्दिलक्षी व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी पुरेशी जागा उपलब्ध आहे.शाळेतील मुलांची पटसंख्या वाढविण्यासाठी खालील उपाययोजना / कार्यवाही करण्यात येत आहेत.

विद्यार्थी प्रवेश संख्येत सातत्याने घट होत असल्याने सन २०१९ पासून इ. ९ वी १० वी स्तरावरील स्वयंपूर्ण शाळेचे रुपांतर तांत्रिक केंद्रात केले आहे. मात्र इ.११ वी १२ वी स्तरावरील व्दिलक्षी व्यवसाय अभ्यासक्रम हे स्वयंपूर्ण कनिष्ठ महाविद्यालय म्हणून राबविण्यात येत आहेत. विद्यार्थ्यांना रोजगाराच्या संधी उपलब्ध होण्याच्या अनुषंगाने काळानुरुप औद्योगिक आस्थापनेला गरज असणाऱ्या तांत्रिक कौशल्याबाबतचे कौशल्य विद्यापीठाअंतर्गत नवीन तंत्रज्ञानावर आधारीत बी.टेक- आयटी., बी. टेक- कॉम्प्युटर सायन्स, बी.टेक- ए.आय. ॲण्ड डाटा सायन्स इ. अभ्यासक्रम सुरु करण्यात येणार आहेत. विभागांतर्गत ८ वी ते पदवीपर्यंतचे तांत्रिक अभ्यासक्रम सुरु करण्यात येवून त्याव्दारे मोठ्या प्रमाणात विद्यार्थ्यांना प्रशिक्षणाच्या संधी उपलब्ध करुन देण्यात येणार आहेत.

संस्थेतील उपलब्ध संसाधनांचा महत्तम वापर होण्याच्या दृष्टीने कौशल्य केंद्राची स्थापना करण्यात आली आहे. त्यानुषंगाने पहिल्या टप्प्यात फीटर-फॅब्रिकेशन व इलेक्ट्रीशियन डोमेस्टिक सोल्युशन हे अल्पमुदतीचे तांत्रिक व्यवसाय अभ्यासक्रम सुरु करण्यात येणार आहेत. त्यामुळे विद्यार्थी, युवक यांना कौशल्याधारीत उच्च शिक्षणाच्या संधी उपलब्ध झाल्यामुळे त्याचा लाभ रोजगार व स्वयंरोजगारासाठी होणार आहे.

संस्थेच्या विकासासाठी व इमारतीच्या परिसराचे जतन व संवर्धन तसेच सुशोभिकरण करण्यासाठी एल्फिन्स्टन तांत्रिक विद्यालयाच्या मुख्य इमारतीची हेरिटेज इमारती अंतर्गत (टप्पा-१) जिर्णोद्धार व इमारत सुशोभिकरणाचे काम प्रगतीपथावर आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यात ७८ टक्के गावे मूलभूत सुविधांपासून वंचित असल्याबाबत

**(१९) २०८६६ (०८-०८-२०२३) श्री.सुधाकर अडबाले :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्र शासनाने प्रसिध्द केलेल्या अहवालातून राज्यातील साडेतीनशे तालुक्यातील गावे शिक्षण, वीज, पाणी,रस्ते, सिंचन, रेशन अशा मूलभूत सुविधांपासून वंचित असल्याची बाब माहे मार्च, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने राज्यातील मूलभूत सुविधांपासून वंचित असलेल्या गावांचा आढावा घेऊन आवश्यक सोयी-सुविधा उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही अथवा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीश महाजन (०१-११-२०२३) :** (१) नाही, हे खरे नाही. अशी बाब या विभागाच्या निदर्शनास आली नाही.

(२) तथापि, लेखाशीर्ष २५१५ १२३८ (मा.लोकप्रतिनिधींनी सुचविलेल्या ग्रामीण भागातील गावांतर्गत मूलभूत सुविधा पुरविणे) अंतर्गत शासन मान्यतेने गावातील मूलभूत सुविधांची जसे की रस्ते, गटारी,

स्मशानभूमी, सामाजिक सभागृह इत्यादी कामे मंजूर केली जातात. त्यानुसार सन २०२२-२३ या आर्थिक वर्षात सदर योजनेंतर्गत गावांतर्गत मूलभूत सुविधांसाठी एकूण रुपये १९९९.९९ रक्कमेच्या कामांना मंजूरी देण्यात आली आहे. तसेच सन २०२३-२४ या आर्थिक वर्षात गावांतर्गत मूलभूत सुविधांसाठी रुपये २२६७.७५ इतक्या रक्कमेची तरतूद करण्यात आली आहे.तसेच, शासनाच्या अन्य विभागाकडून वीज, पाणी, रस्ते व सिंचन याप्रकरणी निधी उपलब्धतेनुसार सुविधा देण्यात येत असतात.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यात अहर्ताप्राप्त परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या पोलीस हवालदारांना पोलीस उपनिरीक्षक पदी पदोन्नती देण्याबाबत

**(२०) ४९३४६ (०२-०२-२०२१) श्री.विलास पोतनीस :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात सन २०१३ मध्ये घेण्यात आलेल्या अहर्ताप्राप्त परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या पोलीस हवालदारांना पदोन्नती देण्यात आली नसल्याचे दिनांक १९ डिसेंबर, २०१९ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सद्य:स्थितीत राज्यात पोलीस उपनिरीक्षकांची सुमारे ६०५ पदे रिक्त आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन अहर्ताप्राप्त परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या पोलीस हवालदारांना पोलीस उपनिरीक्षक पदी पदोन्नती देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (२७-१२-२०२१) :** (१), (२) व (३) सेवाप्रवेश नियमातील तरतुदीनुसार पोलीस उपनिरीक्षक या पदावर ५०% कोटा सरळसेवा, २५% कोटा विभागीय परिक्षेव्दारे उत्तीर्ण होणारे उमेदवार व २५% कोटा अर्हताकारी परीक्षा उत्तीर्ण होणाऱ्या अंमलदारांमधून भरण्यात येतात.

सन २०१३ मध्ये झालेल्या अर्हताकारी परिक्षेव्दारे उत्तीर्ण उमेदवारांना त्यांच्या सेवाज्येष्ठतेनुसार टप्प्याटप्प्याने त्यांच्यासाठी असलेल्या २५% कोट्यातून रिक्त पदे विचारात घेऊन पदोन्नती देण्याची कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन :**
**नागपूर.**

**जितेंद्र भोळे**
**सचिव-१ (कार्यभार),**
**महाराष्ट्र विधानपरिषद.**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, नागपूर.